**निशाणी क्रमांक ३४ पुढे सुरु....**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१**

**मी प्रतिज्ञापुर्वक सत्य निवेदन करते की,**

**माझे नाव –** आशाबाई गोपाळ गुळवे

**उलटतपास प्रतिवादी क्र.१, २ व ४ तर्फे विधीज्ञ श्री. बी. डी. जाधव यांच्यामार्फत पुढे सुरु...**

**१३.** दावा मिळकत मौजे नागाठाण येथील गट क्र.१६/३ मधील ८५ आर चे मुळ मालक माझे सासरे होते. दावा मिळकतीचे मुळ मालक पंढरी घोगरे होते किंवा कसे तसेच प्रतिवादी क्र.४ च्या वडीलांनी सन १९६९ मध्ये ती मिळकत पंढरी घोगरे यांच्याकडुन विकत घेतली किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे ग्याना गुळवे यांनी सन २००४ मध्ये विजयकुमार दराडे यांना दावा मिळकत विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे यांनी विजयकुमार दराडे यांच्या हक्कात खरेदीखत क्र.९९५/२२०४ करून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, विजयकुमार दराडे यांनी माझ्या सासऱ्यांना सदर खरेदीखतापोटी व त्यांचा घरखर्च व कर्ज रक्कम भरण्यासाठी रुपये ६५,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ चे वडील पांडुरंग कांबळे यांनी माझ्या सासऱ्यांना सन १९७४ मध्ये खरेदी दिली होती. त्या खरेदीखताचा क्र.१३१५/१९७४ आहे किंवा कसे ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सन १९७४ ते २००४ या कालावधीमध्ये माझ्या सासऱ्यांच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत आमची वाडवडीलार्जित मिळकत नाही. विजयकुमार दराडे यांच्या हक्कातील खरेदीखतामध्ये दावा जमिनीवर माझ्या सासऱ्यांच्या वंशजांचा कसलाही हक्क व अधिकार नाही असे माझ्या सासऱ्यांनी लिहून दिले होते किंवा कसे ते मला माहीत नाही.

**१४.** दावा जमिनीच्या दक्षिण बाजूस प्रकाश पांडुरंग कांबळे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या दक्षिणेच्या प्रतिवादी क्र.४ ची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीच्या दक्षिणेस प्रकाश कांबळेचे जमिन असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ मधील दावा

मिळकतीचा ७/१२ विजयकुमार दराडे यांच्या नावावर होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ मधील विजयकुमार दराडे याच्या नावावर फेरफार होत असताना आम्ही आक्षेप घेतलेला नाही. सन २०१२ मध्ये आमचे वाटप कोणत्या तारखेला झाले ते मी सांगु शकत नाही. परंतु ते वेळअमावशेच्या आधी झालेले आहे. आमच्या वाटपावेळी दहा ते बारा माणसे हजर होती. त्यामध्ये रामबाबा व इतर गावातील लोक होते त्यांची नावे मी सांगु शकत नाही. त्या वाटपामध्ये मला दराडे यांना विक्री केलेली जमिन आलेले आहे. आमच्या घरातील इतरांना कोणती जमिन गेली ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विजयकुमार दराडे यांनी दावा मिळकत सन २०१२ मध्ये प्रतिवादी क्र.१ ला विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ मध्ये दावा मिळकतीचा ७/१२ उतारा प्रतिवादी क्र.१ च्या नावे झाला. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ ते २०१२ या कालावधीमध्ये दावा मिळकत विजयकुमार दराडे यांच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ मध्ये दराडे यांनी प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकत विक्री केल्यानंतर आम्ही तक्रार केली नव्हती. मी प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडुन रुपये १,६५,०००/– घेवून प्रतिवादी क्र.३ ला दिले याबाबत कोणताही कागद केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ च्या नावे नाममात्र खरेदीखत केल्याबाबत मी कागद अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीचे पुर्नःहस्तांतरण करण्याचे ठरले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीवर माझा कधीही ताबा नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ मध्ये दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ ने सोयाबिन व तुरीचे पीक घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, प्रतिवादी क्र.१ व विजयकुमार दराडे यांच्यामध्ये तोंडी करार झाल्याचे मी खोटे सांगत आहे. सदर तोंडी करार कुठे व कधी झाला ते मला आठवत नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सन २०२३ मध्ये मला दावा जमिनीतुन बेदखल करण्याचा प्रयत्न केला असे मी शपथपत्रात जे नमूद केले आहे त्याबाबत पोलीसात मी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला दावा मिळकतीचा ताबा दिला नसल्याचे मी खोटे कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने दावा जमिनीमध्ये दोन बोर, एक विहीर घेवून ऊसाचे पिक घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिन कास्त करून मी उत्पन्न घेते हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांचा दावा जमिनीवर ताबा

असल्याने त्यांनी ती जमिन प्रतिवादी क्र.४ यांना रुपये ४,४०,०००/– ला विक्री केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या सासऱ्यांच्या नावे होती म्हणून मी ती हडप करण्यासाठी खोटा दावा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीशी माझा कसलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून मी खोटी साक्ष देत आहे.

श्रृवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

**स्वा**/-

**दिनांक** – २०.०६.२०२५.

**स्थळ–** अहमदपूर

(**स्वानंदी दे. वडगांवकर** )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.